VOL- VIII ISSUE- XII DECEMBER 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# महिला राखीव जागांसंबंधी संसदेची भूमिका आणि राजकारण

**प्रा.डॉ.टी.एम.पाटील ,**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड

**सारांश :**

*आपल्या देशाला स्त्रियांचा राजकारणातला ७३ वय ७४ घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आधी तेहतीस टक्के व मग पन्नास टक्के प्रतिनिधित्व मिळायला लागले आणि स्त्रियांचा हा राजकारणातला प्रवेश वेगवेगळ्या स्तरावर महत्त्वाचा ठरू लागला. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक स्तरावर स्त्री म्हणून तिला आत्मभान येऊ लागले. ग्रामीण पातळीवर स्त्रीनेतृत्व निर्माण होऊ लागले. याच प्रकारे भारतीय संसदेत महिला आरक्षण विधेयक मांडण्यात आले. पण महिला आरक्षण विधेयक एक तपाहून अधिक काळ संसदेत मंजुरीविना रेगाळत पडले आहे. प्रत्येक राजकीय पक्ष महिलांबाबत उदारता दाखवतो आणि आपणच कसे महिलांच्या बाजूचे आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न करतात. परंतु, वास्तवात महिलांसाठी कृती करत नसल्याचे दिसून येते. पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या राजकीय पक्षात महिलांना कोणतेही महत्त्वाचे स्थान किंवा निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले जात नाही. महिला आरक्षणाला या राजकीय पक्षांचा मनापासून पाठिंबा असता तर हे विधेयक एक तपापासून अधिक काळापर्यंत रेंगाळण्याची वेळ पण आली नसती.या विधेयका बाबत संसदेत राजकारण घडत असलेले दिसते. हे विधेयक १९९६ पासून संसदेत आहे पण यावर कोणतीही ठोस कृती झालेली दिसत नाही. निवडणुका जाहीर झाल्या की, प्रत्येक राजकोय पक्षांच्या जाहीरनाम्यांत महिला आरक्षणाचा उल्लेख केलेला आहे. पण संसदेत विधेयक आल्यावर त्यावर त्यांची कृती दिसत नाही. मायावती, जयललिता, सोनिया गांधी, ममता बॅनर्जी या सारख्या पक्षांचे नेतृत्व करणाऱ्या महिलांनासुद्धा आपल्या पक्षात महिलांसाठी आरक्षण लागू करता आले नाही.यावरून एकूणच राजकीय पक्षांमध्ये महिलांच्या राजकीय सहभागाबाबत टोकाची उदासीनता असल्याचे दिसून येते. १९९६ मध्ये संसदीय निवडणुकांच्या वेळी सर्वच राजकीय पक्षांनी आपआपल्या जाहीरनाम्यांत महिलांसाठी ३३ टक्के जागांचे आश्वासन दिले होते. परंतु याच निवडणुकांत महिलांना मात्र उमेदवारी दिली नाही. यामुळे महिला आरक्षणाची संसदेतील वाटचाल अतिशय खडतर असल्याची दिसते. तसेच विविध राजकीय पक्षाची भूमिका संसदेत वेगळी व निवडणुकीच्या काळात वेगळी असल्याचे दिसते असे विसंगती राजकारणात महिला आरक्षन विधेयक अडकलेले दिसते.*

**प्रस्तावना :**

**२१** व्या शतकात लोकशाही शासन व्यवस्था एक आर्दश शासन व्यवस्था मानली जात असून भारतीय घटनाकरांनी संसदीय लोकशाही व्यवस्था स्वीकारली असून भारतीय राज्यघटनेत समानसंधी, समानतेचा, स्वांतत्र्यचा अधिकार देले असून महिलांना समान संधी दिली आहे. पण तिचा व्यापक स्तरावर अंमलबजावणी करण्याची मानसिकता अजूनही झालेली दिसत नाही. यामुळेच महिला आरक्षण विधेयक अधिक काळ संसदेत मंजुरीविना रेगाळत पडले आहे. राजकीय पक्षांना महिलांसाठी कळकळ असती निम्या जागांवर महिलांना संधी दिलेली दिसत नाही. तसेच राजकीय पक्षात महिलांना कोणतेही महत्त्वाचे स्थान किंवा निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले जात नाही. यामुळे महिला आरक्षण विधेयक मंजूर होणे आवश्यक आहे. असे असले तरी ला या राजकीय पक्षांचा मनापासून पाठिंबा असता तर हे विधेयक काळापर्यंत संसदेत रेंगाळण्याची वेळ पण आली नसती. याबाबत महिला राखीव जागांसंबंधी संसदेती भूमिका आणि त्यांचे राजकारण व महिलांची संसदेतील स्थितीचे विवेचन केले आहे.

**महिला आरक्षण विधेयक :**

विषमतावादी समाजातील शोषितांच्या पुनर्वसनासाठी तसेच समाजाच्या न्यायिक पुनर्रचनासाठी दुबळ्यांना अनुकूल अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी भूमिका बाबत धोरणात्मक निर्णय घेताना खुल्या स्पर्धाला मर्यादा घालून संरक्षण तरतुदी करणे म्हणजे आरक्षण होय. आरक्षणाची पहिले तरतूद छत्रपती शाहू महाराज यांनी केली. भारतीय राज्यघटनेने शिक्षण सेवा आणि राजकीय सत्ता इत्यादी क्षेत्रांत आरक्षणाची तरतूद केली आहे. पण स्त्रियांच्या विकासाबाबत घेतलेली राजकीय क्षेत्रातील भूमिका फारशी समाधानकारक वाटत नाही. म्हणून लोकशाहीत महिलांचा

सहभाग आणि नेतृत्वासाठी महिला आरक्षणची आवश्यकता निर्माण झाली. त्याबाबत महिला आरक्षण विधेयक १९९६ला संसदेत मांडले गेले. या विधेयकातील तरतुदी मध्ये लोकसभा आणि विधानसभेतील एकूण सदस्यांच्या एकतृतीयांश संख्या महिलांची असावी, महिलांचे आरक्षण अनुसूचित जाती आणि जमातींच्या महिलांनाही लागू आहे, आरक्षण लागु करतांना ते फिरत्या स्वरूपाचे ठेवले जावे, तसेच ड्रॉ पद्धतीच्या साह्याने आरक्षण निश्चित केले जावे, आरक्षण लागू झाल्यापासून ते १५ वर्षापर्यंत दिले जावे, सर्व राजकीय पक्षांना हे आरक्षण बंधनकारक आहे, आरक्षणात ओबीसींसाठी विशेष वेगळी तरतूद नाही, अँग्लो इंडियन समाजाच्या महिलांसाठी आरक्षण लागू करावे. अशा प्रकारच्या प्रमुख तरतूदी या महिला आरक्षण विधेयकामध्ये आहेत. या तरतुदींमध्ये काही प्रमाणात बदल करावा अशी काही राजकीय पक्षांची इच्छा असल्यामुळे ते या विधेयकाला विरोध करत असल्याचे दिसते त्यानुसार संसदेतील महिला आरक्षण विधेयकाबाबत भूमिका दिसून येते.

**महिला आरक्षण विधेयकाचा संसदेतील मार्गक्रम व भूमिका**

१९९६ च्या लोकसभा निवडणुकात सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात महिलांना राज्य विधिमंडळात व लोकसभेत ३३ टक्के जागा राखीव दिल्या जातील असे आश्वासन देण्यात आले यानुसार केंद्रात संयुक्त आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर पंतप्रधान देवेगौडा सरकारने ८१ वे घटना दुरुस्ती विधेयक १२ सप्टेंबर १९९६ ला संसदेमध्ये मांडले. विधेयक मांडण्यापूवी सर्व राजकीय पक्षांनी आरक्षणाला पाठिंबा देण्याची तयारी दाखवली. मात्र प्रत्यक्षात या विधेयकाबाबत अनेक आक्षेप घेण्यात आले. या विधेयकाला डाव्या पक्षांचा पाठिंबा दिला असला तरी इतर राजकीय पक्षांनी त्याला विरोध केला. श्री. पी.ए. संगमा यांनी राज्यसभेच्या अध्यक्षांशी चर्चा केली आणि हे विधेयक भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या खासदार गीता मुखर्जीच्या अध्यक्षतेखालील खास संयुक्त समितीकडे सोपवण्यात आले. "या ३१ सदस्य समितीत लोकसभेचे २१ तर राज्यसभेचे १० सदस्य होते. यात प्रामुख्याने काँग्रेसचे शरद पवार, मार्गारेट अल्वा, गिरिजा व्यास, सुशीलकुमार शिंदे, भाजपाच्या सुषमा स्वराज, उमा भारती, रिटा शर्मा, समता पक्षाचे नितीनकुमार, बहुजन समाज पक्षाचे जयंत मल्होत्रा, तेलगु देशम पक्षाच्या रेणुका चौधरी इत्यादीचा समावेश होता." प्रबोधन प्रकाशन ज्योती डिसेंबर १९९८ पृ.३८ या समितीने देशातील वेगवेगळ्या राज्यात जाऊन प्रत्यक्ष मुलाखती घेऊन आपला ९ डिसेंबर १९९६ ला संसदेत अहवाल सादर केला असून यामध्ये भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२९, ३३०, ३३१, ३३२, ३३३ आणि ३३४ या कलमांमध्ये उपकलमे जोडली जावीत, लोकसभा आणि विधानसभा यात शक्यतो १/३ च्या जवळपास महिलांसाठी राखीव जागा असाव्यात, या राखीव जागांत घटनेतील तरतुदीनुसार अनुसूचित-जाती, जमातीसाठी सर्वसाधारणपणे ज्या प्रमाणात राखीव जागा असतील त्या प्रमाणात अनुसूचित जाती-जमातीच्या महिलांसाठी राखीव जागा ठेवाव्यात, "ज्या राज्यात लोकसभेच्या केवळ तीन जागा आहेत त्या राज्यात तीन निवडणुकांचा एकत्रितपणे विचारात घेतला जावा. त्या राज्यात केवळ दोनच जागा आहेत त्या राज्यात एक जागा राखीव व एक जागा सर्वसाधारण राहील. प्रत्येक निवडणुकीत जागेची फेरपालट होईल, प्रबोधन प्रकाशन ज्योती डिसेंबर १९९८ पृ.३७, महिलांसाठी राखीव जागा फिरत्या पद्धतीने निश्चित केल्या जातील, शासनाने असा काही मार्ग शोधावा की, ज्यामुळे राज्यसभा आणि विधान परिषदेमध्ये महिलांना राखीव जागा देण्याची मागणी पुढे मांडता येईल. संयुक्त समितीने केलेल्या या प्रमुख शिफारशीसह हे ८१ वे घटना दुरुस्ती विधेयक पुढच्या अधिवेशनामध्ये मांडले. तोपर्यंत बरेच राजकीय बदल झाले. या विधेयका इतर मागासलेल्या जातीतील खासदारांकडून वर आक्षेप घेण्यात आल्याने हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. पुन्हा ८२ वे घटना दुरुस्ती विधेयक रूपाने २० जुलै १९९८ मध्ये संसदेत मांडण्यात आले. त्यावेळी अटलबिहारी बाजपेयी पंतप्रधान होते. हे विधेयक संसदेत मांडण्यात आले. त्यावेळी अनेक राजकीय पक्षांनी या विधेयकाला प्रचंड विरोध केला. यात प्रामुख्याने समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि बहुजन समाज पक्षांच्या खासदारांचा समावेश होता. सभागृहात जवळपास सर्वच मुस्लिम व ओ.बी.सी, खासदारांनी विधेयकास विरोध दर्शवला. काँग्रेसनही विधेयकासबंधी आपली भूमिका बदलली. सुरुवातीला काँग्रेसने विधेयकाला आहे त्या स्वरूपात पाठिंबा जाहीर केला. परंतु काँग्रेस नेत्यांच्या अंतर्गत दबावाने आपल्या भूमिकेत बदल करून ओ.बी.सी व मुस्लिम महिलांसाठी राखीव जागा असल्या पाहिजेत अशी भूमिका घेतली. यावर काँग्रेसच्या काही खासदारांनी पंतप्रधानाची भेट घेऊन हे विधेयक संसदेत मांडले जाऊ नये असा अग्रह धरला. त्यावेळचे लोकसभा सभापती बालयोगी यांनी हे विधेयक काही काळासाठी मांडले जाणार नाही अशी घोषणा केली.

अशा पद्धतीने संसदेत दोन्ही वेळा मांडलेले महिला आरक्षण विधेयक विविध राजकीय पक्षांच्या विरोधी भूमिकेमुळे मंजूर झाले नाही. पुढे ६ मे २००८ रोजी सर्व पक्षांतील महिला सदस्यांनी एकत्र येऊन पूर्वतयारीसह १०८ वे घटना दुरुस्ती विधेयक राज्यसभेत मांडले असून याबाबत चर्चा घडवून आणली. १७ डिसेंबर २००९ रोजी या विधेयकाला मंजुरी मिळाली. पण लोकसभेत या गेले असता

VOL- VIII | ISSUE- XII | DECEMBER | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

यावेळी अनेक आक्षेप घेण्यात आले ज्यामध्ये महिलांच्या कार्यक्षमतेवर आक्षेप घेण्यात आला, महिला हक्क व संरक्षण देणारे अनेक कायदे आहेत आरक्षण कशाला असे विविध प्रश्न निर्माण करून या विधेयकाला विरोध केला यातून खासदारांची पुरुष मानसिकता दिसून येते. अशा प्रकारे महिला विधेयक राज्यसभेत मंजूर झाले आहे आणि त्याला आता लोकसभेच्या मंजुरीची प्रतिक्षा आहे. अनेक राजकीय पक्षांची सकारात्मक भूमिका असूनही या आरक्षण विधेयकाचे राजकारण झाल्याचे दिसून येते. ज्यामुळे या महिला आरक्षण विधेयकाला विरोध झालेला दिसतो.

**महिला आरक्षण व राजकीय पक्ष :**

प्रत्येक राजकीय पक्षांच्या महिला आरक्षणाचा उल्लेख पक्षाच्या जाहीरनाम्यांत केलेला दिसत असून निवडणुकीत आश्वासन दिलेले दिसते. तसेच महिलांच्या प्रती आपल्या पक्षांना किती सहानुभूती, तळमळ आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करत असले तरी वास्तविकता महिलांना दुय्यम स्थान दिलेले-दिते. देशातील ५० कोटी जनता महिला असून ही १९९६ पासून महिला आरक्षण विधेयक आजपर्यंत वेगवेगळ्या कारणांमुळे मंजूर होऊ शकले नाही. हे एक मोठे वास्तव आहे. महिला आरक्षणाला जनसामान्यांचा विरोध नाही, तर पुरुषी राजकारण्याचा त्याला विरोध आहे तसेच राजकीय पक्षाचे नेतृत्व करणारे मायावती, जयललिता, सोनिया गांधी, ममता बॅनर्जी या सारख्यानां आपल्या पक्षात महिलांसाठी आरक्षण लागू करता आले नसल्याचे दिसते. राजकीय पक्ष महिलांविषयी उदार असल्याचे दाखवत असले तरी आपल्या पक्षांत महिलांना ३३ टक्के उमेदवारी देतील अशी शक्यता दिसत नाही. विधेयकात मागासवर्गीय आणि मुस्लिम महिलांचे वेगळे आरक्षण असावे ही दोन्ही यादवांची मागणी असो की, शिवसेना आणि द्रमुकाचा विरोध एक प्रकारे पुरुषी अहंकार या विधेयकाला विरोधी आहे. त्यामूळे विधेयकाला जाणीवपूर्वक फाटे फोडण्याचे अनेक वेळा प्रयत्न झालेला दिसतो.

**महिलांचा संसदेतील सहभागा :** भारतील निवडणुकीच्या माध्यमातून महिलांचा संसदेतील राज्यसभा व लोकसभातील सहभाग पुढील प्रमाणे दिसून येतो.

**महिलांचा संसदेतील सहभाग**

| लोकसभा वर्ष | एकूण महिला | एकूण टक्केवारी | | राज्यसभा वर्ष | एकूण महिला | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **१९५२-५७** | | | | १९५२ | १६ | ७.३० |
| **१९५७-६२** | २२ | ४.४.५ | | १९५७ | १८ | ७.५९ |
| **१९६२-६७** | ३१ | ६.२७ | | १९६१ | १८ | ७.५६ |
| **१९६७-७१** | २९ | ५.५७ | | १९६७ | २० | ८.३३ |
| **१९७१-७७** | २१ | ४.०५ | | १९७१ | १७ | ७.०० |
| **१९७७-८०** | १९ | ३.५० | | १९७७ | २५ | १०.२४ |
| **१९८०-८४** | २८ | ५.१६ | | १९८० | २४ | ९.८३ |
| **१९८४-८९** | ४३ | ७.९३ | | १९८४ | २८ | ११.४७ |
| **१९८९-९१** | २९ | ५.५४ | | १९८९ | २४ | ९.८० |
| **१९९१-९६** | ३८ | ७.०० | | १९९१ | ३८ | १५.५१ |
| **१९९६-९८** | ४० | ७.३६ | | १९९६ | १९ | ८.५२ |
| **१९९८-९९** | ४३ | ७.९१ | | १९९८ | १५ | ६.१२ |
| **१९९९-२००४** | ४९ | ९.०२ | | १९९९ | १९ | ७.७५ |
| **२००४-२००९** | ४५ | ८.२८ | | २००४ | २५ | १०.२८ |
| **२००९-२०१४** | ५९ | १०.८६ | | २००९ | २५ | १०.३३ |
| **२०१४-२०१९** | ६३ | ११.६० | | २०१४ | ३१ | १२.८० |
| **२०१९-२०२४** | ७८ | १४.०० | | | | |

**आधार - बुलेटिन ऑफ युनिक ॲकेडमी, मासिक अंक-४,पुणे, जुलै-२०१४,पृ.क्र.८०**

१९५७ मध्ये दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत केवळ २२ महिला निवडून आल्या, तर सहाव्या लोकसभा निवडणुकीमध्ये केवळ १९ महिला निवडून आल्या, पंधराव्या लोकसभा निवडणुकीत ५९ महिला निवडून आल्या, सोळाव्या लोकसभा निवडणुकीत ६३ महिला निवडून आलेल्या दिसतात. तसेच १७ व्या लोकसभा निवडणुकीत ७८ महिला निवडणून आल्या असून यांची टक्केवारी १४.०० असून सर्वात जास्त महिला निवडून आलेल्या दिसतात. याच प्रमाणे भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह

म्हणून ओळखले जाणारे राज्यसभा या सभागृहामध्ये लोकसभेच्या तुलनेत महिला सदस्यांचे प्रमाण जास्त असले तरी ते पाहिजे त्या प्रमाणात नाही. सुरुवातीला या सभागृहात १६ महिला सदस्य होत्या. नंतर या सदस्य संख्येत काही प्रमाणात वाढ होत गेली. मात्र पुन्हा १९९८ मध्ये सर्वात कमी सदस्य संख्या असल्याचे दिसते. तर १९९१ मध्ये महिला सदस्य संख्येत वाढ झाल्याचे दिसते. १९५२ पासून आजपर्यंत महिला सदस्यांची टक्केवारी ७ ते १५ टक्क्यांपर्यंत राहिली आहे. लोकसभेच्या तुलनेत जरी सदस्य जास्त वाटत असली तरी पाहिजे त्या प्रमाणात सदस्य संख्येत वाढ झालेली नाही

**सारांश :**

आरक्षणाशिवाय महिलांची राजकीय स्थिती मजबूत करणे फार कठीण आहे. कारण बहुतांश राजकीय पक्ष हे पुरुषप्रधान मानसिकतेचे आहेत. जे सर्वसाधारणपणे महिलांना निवडणुकीत उमेदवार बनवत नाहीत. पुरुषप्रधान समाजामुळे महिला प्रमुख पक्षांनाही पुरुषांना उमेदवार म्हणून उभे करणे बंधनकारक आहे. सरकारच्या विधिमंडळ आणि कार्यकारी अवयवांमध्ये महिलांचे स्थान नगण्य आहे, त्यामुळे त्यांना महिलांच्या हक्कांबाबत आवाज उठवता येत नाही, त्यामुळे महिलांना वैधानिक संस्थांमध्ये प्रतिनिधित्वासाठी निश्चित आरक्षण मिळणे आवश्यक आहे. आज महिला आरक्षण हे केवळ दिवास्वप्न वाटत आहे. राजकारणातील आपल्या मक्तेदारीचे आव्हान पुरुष वर्गाला पेलायचे नाही. तसेच महिलांच्या प्रतिनिधीत्वाच्या प्रश्नांवर राजकीय वर्गाची भेदभावाची वृत्ती चिंताजनक आहे. अशा परिस्थितीत संसदेतूनच ती संपुष्टात येऊ लागली, तर कदाचित देशासाठी मोठा संदेश जाईल आणि त्याचवेळी महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक मोठा मार्ग खुला होईल. आपण हे समजून घेतले पाहिजे की स्त्री-पुरुषांचा समान सहभाग केवळ न्याय आणि लोकशाहीसाठीच महत्त्वाचा नाही, तर सुव्यवस्थित मानवी अस्तित्वासाठीही आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१.पोले कांताराव प्रल्हाद - महाराष्ट्रातील पंचायत राज आणि महिला आरक्षण-लातूर, अरुणा प्रकाशन प्रथम आवृत्ती जानेवारी २००९
२.सुभाष प्रा. गवई - संविधानात्मक तरतुदी आणि वास्तव - नागपूर, साईनाथ प्रकाशन ऑगस्ट २००९
३.दैनिक सकाळ दि.३ डिसेंबर २०१३
४.कोलते डॉ. पुंडलिक - पंचायत व्यवस्थेत महिलांचा सहभाग -औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन सप्टेंबर २०१२
५. प्रबोधन प्रकाशन ज्योती डिसेंबर १९९८
६.बुलेटिन ऑफ युनिक अॅकॅडमी, मासिक अंक-४,पुणे, जुलै-२०१४
७. योजना मासिक मार्च २००५